(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)

[१९६०] (१) एस. सी. आर. २८५

अब्दुल रहीम इस्माईल रहीमतुल्ला

विरुद्ध

मुंबई राज्य सरकार

(न्या. जाफर इमाम आणि न्या. जे. एल. कपूर)

फौजदारी खटला - पासपोर्टशिवाय (पारपत्राशिवाय) भारतात प्रवेश - शिक्षा - कायदे आणि नियमांचे विवेचन — गरज पडल्यास घटनापीठाला संदर्भित करणे जेव्हा आवश्यक असेल — भारतीय राज्यघटना, अनुच्छेद १४५ (३)_भारतीय पासपोर्ट नियम, १९५०, कलम ३ आणि ४ - भारतीय पासपोर्ट कायदा (१९२० चा ३४ वा), कलम ३.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आणि त्याच्या आधारे अपीलकर्ता भारतीय नागरिक पासपोर्टशिवाय भारतात दाखल झाला. याचिकाकर्त्याचा युक्तिवाद असा होता की, भारतीयांचे पासपोर्ट नियम १९५० चे कलम ३, हे राज्यघटनेचे उल्लंघन करणारे होते आणि योग्य अर्थाने, कलम आणि नियमांच्या तरतुदी भारतीय नागरिकाला लागू होत नाहीत; आणि जेव्हा एखाद्या खटल्यात घटनात्मक प्रश्नाचा समावेश असतो, तेव्हा तो पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवला जावा, ज्याला "घटनापीठ" असे संबोधले जाते.

ग्राह्य धरले : राज्यघटनेच्या व्याख्येचा कायद्याच्या प्रश्नावर या न्यायालयाच्या घटनापीठाचा बंधनकारक निर्णय असेल आणि तोच प्रश्न दुसऱ्या प्रकरणात उपस्थित केला गेला तर असे म्हणता

येणार नाही की, राज्यघटनेच्या व्याख्येसंदर्भात कायद्याचा कोणताही ठोस प्रश्न निर्माण होईल आणि हे प्रकरण घटनापीठाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

कलम ३ च्या वाजवी व्याख्येवर अधिनियमातील कलम ३ आणि ४ च्या वाजवी विवेचनानुसार, भारतात प्रवेश करणाऱ्या "व्यक्तींकडे" वैध पासपोर्ट असणे आवश्यक आहे, या तरतुदी भारतीय नागरिकांसह भारतात प्रवेश करणाऱ्या सर्व व्यक्तींना लागू होतील यात शंका नाही.

पासपोर्टशिवाय भारतात प्रवेश करण्याचे कृत्य नियमांचे उल्लंघन करणारे होते आणि अपीलकर्त्याला दोषी ठरवण्यात आले ते योग्यच होते.

इब्राहिम वजीर मावत विरुद्ध मुंबई सरकार, [१९५४] एस.सी.आर. ९३३ चे अनुसरण केले.

फौजदारी अपीलय अधिकार क्षेत्र : फौजदारी अपील क्रमांक १८२/१९५७.

फौजदारी खटला क्रमांक १९१३/पी १९५५ मधील इलाखा दंडाधिकारी, १६ वे न्यायालय, एस्प्लेनेड, मुंबई यांच्या ३ जानेवारी १९५६ च्या निकाल व आदेशावरून उद्भवलेल्या फौजदारी पूनरीक्षण अर्ज क्रमांक २७८/१९५६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या ४ जुलै १९५७ चा निर्णय व आदेशावरून अपील.

ओ. एन. श्रीवास्तव आणि जे. बी. दादाचंजी, याचिकाकर्त्यातर्फे.

जी. सी. माथुर आणि आर. एच. ढेबर, प्रतिवादीसाठी.

१४ मे १९५९. न्यायालयाचा निर्णय न्या. इमाम यांच्याद्वारे पारित करण्यात आला — अपीलकर्त्याला भारतीय पासपोर्ट नियम, १९५०, चे नियम ६ (अ) अन्वये दोषी ठरवण्यात आले होते, [या नंतर भारतीय पासपोर्ट कायदा (१९२० चा ३४ वा) च्या कलम ३ अंतर्गत बनवलेले नियम म्हणून संदर्भित] आणि १०० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. उच्च न्यायालयाने आपल्या पूनरीक्षण

अधिकारक्षेत्राचा वापर करून शिक्षा कायम ठेवली, परंतु शिक्षा कमी करून २५ रुपये दंड केला. हे प्रकरण या न्यायालयात अपील करण्यासाठी योग्य असल्याचे प्रमाणपत्र अपीलकर्त्याला दिले.

हे आता वादाच्या पलीकडे आहे की, अपीलकर्ता भारताचा नागरिक आहे. मान्य आहे की तो पासपोर्टशिवाय भारताच्या हद्दीत घुसला होता. भारताच्या हद्दीत घुसखोरी करणे हा नियमांच्या कलम ६ (अ) अन्वये दंडनीय गुन्हा आहे का, हा एकमेव प्रश्न आहे.

हा कायदा १९२0 मध्ये संमत करण्यात आला होता आणि त्यानंतर तो दुरुस्ती आणि बदलाचा विषय आहे. त्याची प्रस्तावना पुढीलप्रमाणे, "भारतात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना पासपोर्टची आवश्यकता आहे, हे अधिकार घेणे योग्य आहे, ते खालीलप्रमाणे लागू केले आहे." "पासपोर्ट" म्हणजे विहित प्राधिकरणाने जारी केलेला किंवा नूतनीकरण केलेला आणि पासपोर्टच्या वर्गाशी संबंधित विहित अटींची पूर्तता करणारा पासपोर्ट म्हणून परिभाषित करण्यात आला आहे. कलम ३ मध्ये म्हटले आहे :

(१)भारतात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींकडे पासपोर्ट असणे आवश्यक आहे, त्या उद्देशाने अनुषंगिक किंवा प्रासंगिक सर्व बाबींसाठी केंद्र सरकार नियम बनवू शकते.

(२) पूर्वाश्रमीच्या सामान्यतेचा पूर्वग्रह न बाळगता.असे नियम असू शकतात -

(अ) ज्या व्यक्तीच्या ताब्यात पासपोर्ट नाही, अशा कोणत्याही व्यक्तीला भारतात किंवा त्याच्या कोणत्याही भागात प्रवेश करण्यास मनाई करणे;

(ब) या कायद्याच्या हेतूसाठी ज्या प्राधिकरणाद्वारे पासपोर्ट जारी किंवा नूतनीकरण केले गेले असावे आणि कोणत्या अटींचे पालन करणे आवश्यक आहे हे निर्धारित करणे; आणि

(क) अशा नियमांच्या कोणत्याही तरतुदीतून कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला पूर्णपणे किंवा कोणत्याही अटीवर सूट देण्याची तरतूद आहे.

(३) या कलमांतर्गत बनवलेले नियम अशी तरतूद करू शकतात की, त्यांचे किंवा अशा कोणत्याही नियमाच्या अधिकाराखाली जारी केलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास तीन महिन्यांपर्यंतच्या कारावासाची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

(४) या कलमांतर्गत केलेले सर्व नियम अधिकृत राजपत्रात प्रकाशित केले जातील आणि त्यानंतर ते या कायद्यात लागू केल्याप्रमाणे प्रभावी होतील.

नियमांच्या नियम ३ मध्ये असे म्हटले आहे:

"नियम ४ मधील तरतुदीवगळता, भारताबाहेरून कोणत्याही ठिकाणाहून येणारी कोणतीही व्यक्ती, नियम ५ मधील अटींनुसार वैध पासपोर्ट असल्याशिवाय पाणी, जमीन किंवा हवाई मार्गाने भारतात प्रवेश करू शकत नाही किंवा प्रवेश करण्याचा प्रयत्न करू शकत नाही."

नियम ४ मध्ये अशा व्यक्तींचा उल्लेख आहे ज्यांना नियम ३ च्या तरतुदींमधून सूट दिली जाईल. नियम ४ च्या खंड (ब) नुसार, भारतीय नौदल, लष्करी किंवा हवाई दलाचे सदस्य आणि अशा व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यांना अशा व्यक्तीसोबत सरकारी वाहतुकीने भारतात येताना सूट देण्यात आली आहे. खंड (क) मध्ये भारतामधील कोणत्याही फ्रेंच आस्थापनातून (कैराकलमधील पाँडिचेरी वगळता) किंवा भारत किंवा पाकिस्तानमधील कोणत्याही पोर्तुगीज आस्थापनांमधून भारतात वास्तव्यास असलेल्या व्यक्तींना सूट देण्यात आली आहे. कलम (फ) मध्ये भारतात वास्तव्यास असलेल्या व्यक्तींना नेपाळी किंवा तिबेटी सीमेवरून जमीनमार्गे किंवा हवाई मार्गाने

भारतात प्रवेश करण्यास सूट देण्यात आली आहे. खंड (ह) मध्ये जेद्दाह किंवा बसरा येथून परतणाऱ्या खऱ्या मुस्लिम यात्रेकरूंना सूट देण्यात आली आहे आणि खंड (इ) केंद्र सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशांद्वारे निर्दिष्ट केलेल्या इतर व्यक्ती किंवा व्यक्तींच्या वर्गांना सूट देते.

अपीलकर्त्याच्या भारतात प्रवेशाची तारीख ज्ञात नाही. — २६ फेब्रुवारी १९५५ रोजी त्याला निश्चितच अटक करण्यात आली होती आणि त्याचे म्हणणे असे आहे की, इब्राहिम वझीर मावत विरुद्ध मुंबई सरकार (१) या खटल्यातील या न्यायालयाचा निर्णय दिल्यानंतर काही काळाने तो भारतात दाखल झाला होता. त्या खटल्यामध्ये या न्यायालयाचा निकाल १५ फेब्रुवारी १९५४ रोजी देण्यात आला होता. त्या आधारावर अपीलकर्त्याने १५ फेब्रुवारी १९५४ नंतर आणि २६ फेब्रुवारी १९५५ पूर्वी भारतात प्रवेश केला होता. अपीलकर्ता जेव्हा पहिल्यांदा कराचीला गेला होता तेव्हाच्या १९ नोव्हेंबर १९४८ दरम्यानच्या हालचालींचा आणि २६ फेब्रुवारी १९५५ रोजी अटक झाली हा तपशीलावर उल्लेख करणे अनावश्यक आहे. कारण या कालावधीतील त्याच्या हालचाली अपीलकर्त्याने नियमांच्या नियम ६ अंतर्गत गुन्हा केला आहे की नाही हे ठरवण्यासाठी संबंधित नाहीत. २६ फेब्रुवारी १९५५ रोजी अटक होण्यापूर्वी कधीतरी अपीलकर्त्याने पासपोर्टशिवाय भारतात प्रवेश केला आहे या आधारावर खटल्याचा निकाल लागला पाहिजे.

अपीलकर्त्याच्या वतीने दोन मुद्दे उपस्थित करण्यात आले (१) नियमांचे पोटनियम ३ आणि कायद्याचे कलम ३ हे राज्यघटनेच्या विरोधात होते कारण ते भारतीय नागरिकाच्या पासपोर्टशिवाय भारतात प्रवेश करण्याच्या अधिकारावर परिणाम करतात आणि (२) कायद्याच्या कलम ३ आणि नियमांच्या पोटनियम ३ मधील तरतुदींचा योग्य अर्थ लावल्यास या तरतुदी भारतीय नागरिकांना लागू होत नव्हत्या. ते केवळ अभारतीय नागरिकांना लागू होते.

पहिल्या युक्तिवादानुसार या कायद्यातील कलम ३ आणि भारतीय नागरिकाशी संबंधित असलेल्या नियमांच्या पोटनियम ३ हे घटनेच्या विरोधात आहेत, कारण ते अनुच्छेद १९ (१) (डी) आणि (ई) मधील तरतुदींच्या विरोधात आहेत. अनुच्छेद १९ (१)(डी) सर्व भारतीय नागरिकांना "भारत प्रदेशात मुक्तपणे फिरण्याचा" मूलभूत अधिकार प्रदान करते आणि अनुच्छेद १९ (१) (ई) "भारताच्या कोणत्याही भागात राहणे आणि स्थायिक होणे." हा मूलभूत अधिकार मात्र अनुच्छेद १९ च्या खंड (५) अन्वये वाजवी निर्बंधांच्या अधीन आहे. इब्राहीम वजीर मावत विरुद्ध मुंबई सरकार या न्यायालयाच्या बहुमताच्या निर्णयानुसार कोणत्याही कारणासाठी पाकिस्तानला भेट देणाऱ्या आणि भारतात परतणाऱ्या भारतीय नागरिकाला भारतात प्रवेश देण्यापूर्वी परवाना किंवा पासपोर्ट सादर करणे आवश्यक असू शकते आणि ही आवश्यकता प्रवेशावरील योग्य निर्बंध मानली जाऊ शकते. मात्र, या न्यायालयाने असे मानले की, जर तो परवान्याशिवाय भारतात प्रवेश करत असेल तर त्याला अशा गुन्ह्यासाठी दोषी ठरवून त्याला भारतातून काढून टाकण्याचा आदेश दिला जाऊ शकतो, असे म्हणणे ही वेगळी बाब आहे. त्याला भारतातून काढून टाकण्याचे निर्देश देणारा हा आदेश होता जो या न्यायालयाने त्याला अनुच्छेद १९ (१)(सी) अंतर्गत हमी दिलेला मुलभूत हक्क हिरावून घेण्यासारखा असल्याचे म्हटले होते, "भारताच्या प्रदेशाच्या कोणत्याही भागात राहणे आणि स्थायिक होणे". त्यामुळे हे स्पष्ट आहे की, जिथंपर्यंत या न्यायालयाचा संबंध आहे, या न्यायालयाने आधीच ठरवले आहे की, भारतीय नागरिकाला 'भारतात प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी पासपोर्ट सादर करणे आवश्यक आहे, हे भारतात प्रवेश करण्यावर योग्य प्रतिबंध मानले जाऊ शकते. हा निर्णय आपल्यावर बंधनकारक आहे आणि आपण संदर्भित प्रकरणात या न्यायालयाच्या निर्णयाचे पालन केले पाहिजे. तथापि, असा आग्रह करण्यात आला

की, घटनात्मक प्रश्न उपस्थित केला गेला असल्याने या प्रकरणाचा निर्णय पाच पेक्षा कमी न्यायाधीशांद्वारे करता येणार नाही. त्यामुळे घटनापीठ म्हणून ज्याचे वर्णन केले जाते त्यांच्याकडे हे प्रकरण संदर्भित करण्यात यावे. राज्यघटनेच्या अनुच्छेद १४५(३) मध्ये असे नमूद केले आहे की, ज्या न्यायाधीशांना 'संविधानाचा अर्थ लावण्यासाठी किंवा अनुच्छेद १४३ खालील कोणत्याही संदर्भावर सुनावणी करण्याच्या उद्देशाने कायद्याच्या महत्त्वपूर्ण प्रश्नाचा समावेश असलेल्या कोणत्याही खटल्याचा निर्णय घेण्याच्या उद्देशाने बसायचे आहे त्यांची संख्या पाच असेल. हे स्पष्ट आहे की, सध्याच्या प्रकरणात संविधानाचा अर्थ लावण्याबाबत कायद्याचा कोणताही ठोस प्रश्न उद्भवत नाही कारण उपस्थित केलेल्या प्रश्नावरच या न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने निर्णय दिला आहे. आमच्यासमोर उपस्थित केलेल्या प्रश्नावर या न्यायालयाने आधीच निर्णय दिला असल्याने कायद्याचा कोणताही ठोस प्रश्न निर्माण झाला आहे असे म्हणता येणार नाही.

युक्तिवादाततील दुसऱ्या मुद्द्याबद्दल सांगायचे झाले तर, आम्हाला सांगायला संकोच वाटत नाही की, कायद्याचे कलम ३ मध्ये वापरलेले शब्द आणि नियमांच्या पोटनियम ३ आणि ४ मध्ये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, ते भारतीय नागरिकासह प्रत्येक व्यक्तीला लागू होतात. या कायद्याच्या कलम ३(१) अन्वये "व्यक्ती" हा शब्द कोणत्याही पात्रतेशिवाय नमूद करण्यात आला आहे. कलम ३(२)(ए) अन्वये वापरले जाणारे शब्द म्हणजे "कोणतीही व्यक्ती" आणि नियम ३ मध्ये वापरलेले शब्द "कोणतीही व्यक्ती नाही" आहेत. नियम ४ चा खंड (बी) अर्थातच भारतीय नागरिकांना लागू होतो आणि त्या कलमात नमूद केलेल्याना नियम ३ च्या अंमलबजावणीतून विशेष सूट देण्यात आली आहे. नियम ४ (१) मधील खंड (एच) भारतीय नागरिकांना लागू होऊ शकते जे धर्माने मुस्लिम आहेत. त्यांना सूट देण्यात आली आहे. म्हणून, या कायद्यातील कलम ३ आणि

नियमांच्या पोटनियम ३ आणि ४ चे वाजवी विवेचनानुसार या तरतुदी भारतीय नागरिकांसह सर्व व्यक्तींना लागू होतात यात शंका नाही.

आमच्या मते, पासपोर्टशिवाय अपीलकर्त्याने भारतात प्रवेश करणे हे नियमांच्या पोटनियम ३ चे उल्लंघन होते आणि त्यामुळे तो नियम ६ अन्वये दंडनीय आहे आणि अपीलकर्ता योग्यरीत्या दोषी ठरला होता. त्यानुसार अपील फेटाळण्यात आले.

अपील फेटाळण्यात आले

**अस्वीकारण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

---------